**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, MAR-APR, 2019, VOL- 6/50*

# संशोधन प्रश्न व संशोधन उद्दिष्ट्य मांडणी

**एच. डी. चित्ते, Ph. D.**

*शिक्षणशास्त्र महाविद्यालय, एम. एड्. (विभाग) नाशिक*

*Scholarly Research Journal is licensed Based on a work at www.srjis.com*

## संशोधन प्रश्न Research Questions :

संशोधन प्रश्न निर्माण झाल्याशिवाय संशोधन समस्या निश्चिती संशोधकाला अशक्य आहे. Unless and Until Research questions are created/determined. Researcher Cannot determine Research title म्हणूनच, संशोधन उद्दिष्टांआधी संशोधन प्रश्न निर्माण होतात.

उदा. १) एम.एड. प्रशिक्षणार्थींना MED १०४ हा संशोधन विषय पारंपारिक पद्धतीने शिकविल्यास का समजत नाही ?

२) कोणत्या नवीन तंत्राने, प्रतिमानाने किंवा उपक्रम राबवून शिकविले तर प्रशिक्षणार्थ्यांना संशोधन विषय समजेल ?

३) संगणक सहाय्यित कार्यक्रमाने संशोधन विषय शिकविला तर प्रशिक्षणार्थ्यांना समजेल काय ?

अशा प्रकारचे संशोधन प्रश्न पडल्यानंतर पुढील संशोधन समस्या निश्चित करता येईल. MED १०४ / संशोधन विषयाच्या अध्यापनाकरिता संगणक सहाय्यित कार्यक्रमाची निर्मिती व परिणामकारकतेचा अभ्यास.

## संशोधन उद्दिष्टे Research Objectives :

संशोधन उद्दिष्टे निश्चित करतांना संशोधक/संशोधिकेने जाणीवपूर्वक काळजी घेणे गरजेचे आहे. समस्या विधानास पूरक उद्दिष्ट निर्मिती करावी. उद्दिष्टे रचना करतांना खालील दोन पैलू विचारात घ्यावेत.

१) वेळ मर्यादा

२) उद्दिष्ट साध्यता

- उद्दिष्ट्ये ही जास्तीत जास्त ४-५ असावीत.
- उद्दिष्ट्ये ही क्रिया/कृती दर्शक असावीत.
- उद्दिष्ट्ये ही समस्याभिमुख असावीत.

संशोधन कार्यात खालीलप्रमाणे शृंखला असते. व ते सर्व घटक एकमेकांवर अवलंबून असतात.

समस्या → उद्दिष्ट्ये → पद्धती व साधने → निष्कर्ष/पडताळणी

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

समजा, जनता विद्यालय, सातपूर शाळेतील सेमी इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या अध्ययनात येणा-या समस्यांचा शोध, उपाययोजना व परिणामकारकतेचा अभ्यास असे संशोधन शीर्षक असेल तर पुढीलप्रमाणे उद्दिष्टे मांडावीत.

१) जनता विद्यालय, सातपूर शाळेतील सेमी इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या अध्ययनात येणा-या समस्यांचा शोध घेणे.

२) जनता विद्यालय, सातपूर शाळेतील सेमी इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या अध्ययनात आलेल्या समस्यांच्या कारणांचा शोध घेणे.

३) जनता विद्यालय, सातपूर शाळेतील सेमी इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या अध्ययनात आलेल्या समस्यांच्या निराकरणासाठी उपाययोजना सूचविणे.

४) जनता विद्यालय, सातपूर शाळेतील सेमी इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या अध्ययनात आलेल्या समस्यांच्या निराकरणासाठी सूचविलेल्या उपाययोजनांची परिणामकारकता अभ्यासणे.

तसेच, इयत्ता दहावीच्या एस.एस.सी. बोर्डाच्या मराठी माध्यमाच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकाचा चिकित्सक अभ्यास या संशोधनासाठी साधारणपणे उद्दिष्टे पुढीलप्रमाणे येतील.

१) इयत्ता दहावीच्या एस.एस.सी. बोर्डाच्या मराठी माध्यमाच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगाचे परीक्षण करणे.

२) इयत्ता दहावीच्या एस.एस.सी. बोर्डाच्या मराठी माध्यमाच्या पाठ्यपुस्तकाच्या बाह्यांगाचे परिक्षण करणे.

३) पाठ्यपुस्तकाच्या अध्यापनासंदर्भात शिक्षकांच्या समस्यांचा शोध घेणे.

४) पाठ्यपुस्तकात अंतर्भाव झालेल्या गाभाभूत घटकांचा व मूल्यांचा अभ्यास करणे.

५) पाठ्यपुस्तकातील उणिवांचा शोध घेणे व उपाय सूचविणे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*